# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी, पुणे – ४११०१८
## करआकारणी व करसंकलन विभाग

दुरध्वनी क्रमांक : 020-67331504 फॅक्स क्रमांक : 27425600
020-67331506 67331545
E-mail : ptax@pcmcindia.gov.in
Website :www.pcmcindia.gov.in


जावक क्रमांक : कर/मुख्य/९ /कावि/४७/२०१९

दिनांक : ८/७/२०१९

**विषय :** पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रात आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना राबवून निवड झालेल्या सोसायटींना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने सामान्य करामध्ये सूट देणेबाबत

आदेश,

केंद्र शासनाने "स्वच्छ भारत अभियान" दिनांक ०२/१०/२०१४ पासून घोषित केले असून दिनांक ०२/१०/२०१४ ते दिनांक ०२/१०/२०१९ या कालावधीत अभियान राबविण्यात येत आहे. या अभियाना अंतर्गत शहरे हागणदारी मुक्त करणे व घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत शहरे स्वच्छ करणे या दोन प्रमुख बाबींचा समावेश आहे. केंद्र शासनाच्या "स्वच्छ भारत अभियान (नागरी)" च्या धर्तीवर दिनांक १५/०५/२०१५ च्या शासन निर्णयान्वये राज्यामध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियानची (नागरी) अंमलबजावणी सुरू आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत शहरात स्वयंसेवी संस्था, सहकारी गृह रचना संस्था,नागरिक यांचे सहकार्याने स्वच्छ भारत अभियान राबविण्यात येत आहे.

स्वच्छ भारत अभियानाचा जास्तीत जास्त प्रसार होऊन नागरिकांचा त्यामध्ये समावेश वाढण्याच्या दृष्टीने शहरातील गृहप्रकल्पांमध्ये पर्यावरण पूरक व स्वच्छता विषयक स्पर्धा झाल्यास शहर पर्यावरण पूरक व स्वच्छ होणेस मदत होईल, पर्यायाने कचरा वाहतूक व विल्हेवाट करण्यासाठी महानगरपालिकेवर व इतर शासकीय यंत्रणांवर पडणारा अतिरिक्त ताण काही प्रमाणात कमी होण्यास मदत होईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम १४०-अ मध्ये मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरल्यास व १४०-ब मध्ये परिस्थितीकीयदृष्ट्या लाभदायक योजनेची अंमलबजावणी करणेकरिता करात सूट देणेची तरतूद आहे. "आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी" बक्षीस योजना खालीलप्रमाणे राबविणेकामी मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३४६१, दिनांक ३०/१०/२०१८ व मा. महापालिका सभा ठराव क्रमांक ३२४, दिनांक २०/१२/२०१८ अन्वये कार्यवाही करणेस मान्यता दिलेली आहे.

1. "आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी" बक्षीस योजना खालीलप्रमाणे ०२ गटामध्ये स्पर्धा घेणे.

| | |
|---|---|
| गट 1 – १२ते १०० फ्लॅट / बंगलो / रो हाऊस असलेली सोसायटी | क्षेत्रिय कार्यालयनिहाय १ या प्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयातून ८ सोसायट्यांची निवड |
| गट 2 – १०० चे पुढील फ्लॅट / बंगलो / रो हाऊस असलेली सोसायटी | क्षेत्रिय कार्यालयनिहाय १ या प्रमाणे ८ क्षेत्रिय कार्यालयातून ८ सोसायट्यांची निवड |

2. स्पर्धेमध्ये भाग घेणाऱ्या आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटीने १००% पाणीपट्टी व सोसायटी मधील मिळकतधारकांनी ९०% मिळकतकराचा भरणा करणे अनिवार्य राहील.

3. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेत सहभागी होणेकामी सोसायटी / गृह प्रकल्पांचे क्षेत्रिय कार्यालय स्तरावर अर्ज स्विकारुन निश्चित केलेल्या निकषांनुसार तपासणी करणेकामी प्रत्येक क्षेत्रिय कार्यालयाकरिता 1. दोन मनपा अधिकारी 2. एक अशासकीय संस्थेचा प्रतिनिधी 3. एक पत्रकार, यांचा समावेश करुन सोबत जोडलेल्या प्रपत्र अ नुसार तपासणी पथकांची नेमणूक करणेत येत आहे.

4. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना अंमलबजावणीचे मुख्य निकष व गुण खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | मुख्य निकष | गुणांक |
|---|---|---|
| 1 | इमारत व इमारतीचे परिसरामध्ये 100% कचरा वर्गीकरण व प्रक्रिया | 30 |
| 2 | पाणी संवर्धन, पाणी पुनर्चक्रण, पाणी पुनर्वापर | 20 |
| 3 | सौर उर्जा प्रकल्प, एल.ई.डी. दिव्यांचा वापर | 15 |
| 4 | वृक्षारोपण आणि संवर्धन, लॅण्ड स्केपिंग | 20 |
| 5 | पर्यावरण पूरक नाविन्यपूर्ण उपक्रम | 15 |
| | एकूण | 100 |

5. शहर स्तरावर सर्वोत्कृष्ठ पर्यावरण पूरक उपक्रम राबविणाऱ्या व ५ स्टार असलेल्या ३ सोसायटी यांना आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी तपासणी मध्ये प्राप्त झालेल्या गुणांच्या व स्पर्धांच्या आधारे शहर स्तरावर व रेटिंगनुसार सामान्य करत सवलतीची टक्केवारी

**शहर स्तरावरील सोसायटया**

| अ.क्र. | गुण तपशील | रेटींग | गुणानुक्रम | सामान्य करात सवलत |
|---|---|---|---|---|
| १ | ८६ ते १०० गुण | ***** | ०१ | २५% |
| | | | ०२ | २०% |
| | | | ०३ | १५% |

**शहर स्तरावरील वगळून अन्य सोसायटया**

| अ.क्र. | गुण तपशील | रेटींग | सामान्य करात सवलत |
|---|---|---|---|
| 1 | ८६ ते १०० गुण | ***** | १०% |
| 2 | ७५ ते ८५ गुण | **** | ०७% |
| 3 | ६६ ते ७५ गुण | *** | ०५% |

6. महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील सर्व आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटीची निवड करणे.

7. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी स्पर्धेतील विजेत्या सोसायटींमधील मिळकतींना महापालिकेमार्फत सध्या सामान्य करातील देण्यात येणा-या सवलतीं व्यतिरिक्त स्टार रेटींगनुसार सामान्य करात सवलत देणे.

8. तपासणी केलेल्या आर्थिक वर्षाचे पुढील आर्थिक वर्षात दिनांक ३० जून अखेर थकबाकीसह संपूर्ण बिलाची एक रक्कमी रक्कम भरणा करणा-या मिळकती सवलतीच्या लाभास पात्र राहतील.

9. आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना सन २०१७-२०१८ ते २०१९-२०२० या कालावधीत ३ वर्षे राबविण्यात येईल.

सबब मी आयुक्त, मा. महापालिका सभेने दिलेले मान्यतेनुसार "आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी" बक्षीस योजना स्पर्धेमध्ये सहभाग होणा-या सोसायटी / गृहप्रकल्प / रो हाऊस / बंगलो यांची तपासणी करणेकामी सोबतचे **'प्रपत्र अ'** मध्ये नमूद केलेल्या तपासणी पथकाची नेमणूक करणेस तसेच "आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी" बक्षीस योजना राबविणेकामी खालीलप्रमाणे कार्यवाही करणेस या आदेशान्वये मान्यता देत आहे.

1. सर्व क्षेत्रिय अधिकारी यांनी आपले अधिनस्त कर्मचा-यांमार्फत क्षेत्रिय कार्यालयाचे कायक्षेत्रातील सर्व सोसायटी / गृहप्रकल्प / रो हाऊस / बंगलो यांना उपरोक्त अनुक्रमांक १ मध्ये नमूद केलेनुसार "आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी" बक्षीस योजना स्पर्धेमध्ये सहभागी होणेकामी अर्जांचे वाटप करुन दिनांक ३१जानेवारी पर्यंत अर्जांची स्विकृती करणेत यावी.

2. "आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी" बक्षीस योजना स्पर्धेमध्ये सहभागी होणा-या सोसायटी / गृहप्रकल्प / रो हाऊस / बंगलो यांनी पाणीपट्टी व मिळकत कर भरणा केले असलेबाबत खात्री करुन उपरोक्त अनुक्रमांक १ मध्ये नमूद केलेनुसार त्यांची स्वतंत्र यादी तयार करुन तपासणी निकषाचे फॉर्म तपासणी पथकास उपलब्ध करुन देणे.

3. तपासणी पथकाने त्यांचे नेमणूक केलेल्या क्षेत्रिय कार्यालयाचे कायक्षेत्रातील "आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी" बक्षीस योजना स्पर्धेमध्ये सहभागी होणा-या सोसायटी / गृहप्रकल्प / रो हाऊस / बंगलो यांची निश्चित केलेल्या निकषानुसार तपासणी करुन गुणांक देऊन तपासणी फॉर्मवर स्वाक्षरी करावी.

4. तपासणी पथकाने तपासणी केलेल्या सोसायटी / गृहप्रकल्प / रो हाऊस / बंगलो यांचे तपासणी फॉर्म त्यांना मिळालेल्या गुणांचे उतरत्या क्रमाने लावून त्याची यादी गोषवा-यासह साक्षांकित करुन दिनांक २८ फेब्रुवारी पूर्वी क्षेत्रिय अधिकारी यांचेकडे सादर करावी.

5. क्षेत्रिय अधिकारी यांनी तपासणी पथकाकडून प्राप्त होणारे तपासणी फॉर्म, यादी व गोषवारा याचे अवलोकन करुन प्राप्त गुणांकानुसार उपरोक्त अनुक्रमांक ५ मध्ये नमूद केलेनुसार रेटींग देऊन "आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी" बक्षीस योजनेतील सोसायटी / गृहप्रकल्प / रो हाऊस / बंगलो यांची उपरोक्त नुसार २ गटामध्ये स्वतंत्र यादी करुन मिळकत करामध्ये सवलत देणेकामी करसंकलन विभागाकडे दिनांक १५ मार्च पूर्वी शिफारस करावी.

6. क्षेत्रिय अधिकारी यांनी मिळकत करामध्ये सवलत देणेकामी शिफारस केलेल्या सोसायटी / गृहप्रकल्प / रो हाऊस / बंगलो यामधील मिळकतींना तपासणी केलेल्या आर्थिक वर्षाचे पुढील आर्थिक वर्षात दिनांक ३० जून अखेर थकबाकीसह संपूर्ण बिलाची एक रक्कमी रक्कम भरणा करणा-या मिळकतीस सामान्य करातील इतर सवलतीं व्यतिरिक्त अनुक्रमांक ५ मध्ये नमूद केलेनुसार सामान्य करात सवलत द्यावी.
7. महापालिकेचे जनता सपंर्क विभागामार्फत सदर योजनेची शहरामध्ये व्यापक प्रसिध्दी करणेत यावी.

(श्रावण हर्डीकर)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

प्रति,

1. सर्व क्षेत्रिय अधिकारी

२/- आपले कार्यक्षेत्राकरिता नेमणूक केलेल्या तपासणी सदस्यांना आदेश बजावून उपरोक्त प्रमाणे कामकाज विहित मुदतीत पूर्ण करणे.

2. श्री / श्रीमती ----------------------------------

तपासणी सदस्य, ------------- क्षेत्रिय कार्यालय

3. कर आकारणी व कर संकलन विभाग
4. जनता संपर्क विभाग
5. मुख्य लेखापरिक्षण विभाग
6. लेखा विभाग
7. माहिती व तंत्रज्ञान विभाग
8. मे टेक९ सर्व्हीसेस

३/- विषयांकित सवलत योजनेची अंमलबजावणी करणेकामी संगणक प्रणालीमध्ये योग्य ती दुरुस्ती करणेत यावी.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका , पिंपरी ४११ ०१८

आदर्श पर्यावरण संतुलित सोसायटी बक्षीस योजना तपासणी पथक

आदेश क्रमांक कर/मुख्य/९/कावि/४०/२०१९ दिनांक ८/१/२०१९ लगत (प्रपत्र - अ)

| अ.क्र | क्षेत्रिय कार्यालय | अधिकारी -१ | अधिकारी -२ | एनजीओ | पत्रकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | अ | श्रीम.आशादेवी दुरगुडे, अ क्षेत्रीय अधिकारी मो.नं. ८८८८८४४२१० | श्री.एम.एम.शिंदे, सहा.आरोग्य अधिकारी, अ क्षेत्रीय कार्यालय मो.नं.९९२२५०१११४ | श्री.सुर्यकांत तिलोकचंद मुथियान, पिं.चि.सिटीझन फोरम से.नं. २७,प्लॉ.नं. ३७ प्राधिकरण निगडी पुणे ४४ मो.नं. ९४२३००२४६७ | श्री.आकाश तानाजी मोरे, दै.जनशक्ती, बबन पांढारकर चाळ, पंचतारानगर, आकुर्डी -३५ मो.नं. ९८६०९९३६७४ |
| 2 | ब | श्री.के.डी.दरवडे, सहा.आरोग्य अधिकारी, ब क्षेत्रिय कार्यालय, मो.नं. ९९२२५०१८९८ | श्री. एच.पी.बन्सल, उपअभियंता, ब क्षेत्रिय कार्यालय, मो.नं.९९२२५०१७६५ | श्री. जी.बोरा, पर्यावरण सदस्य, वाल्हेकरवाडी,चिंचवड मो.नं.८८८८८७०७०३ | श्री. एस.घिसे, सकाळ, तानाजीनगर, गजानन महाराज मंदिरासमोर, मयूर निवास, चिंचवड मो.नं. ८३०८८४४३८७ |
| 3 | क | श्री.वायकर विजय किसन, उप अभियंता, (स्थापत्य) क क्षेत्रिय कार्यालय, मो.नं. ९९२२५०१७५० | श्री.भोसले रमेश मारूती, मु.आ.निरिक्षक, क क्षेत्रिय कार्यालय, मो.नं.९९२२५०१८७४ | श्री.कुमठेकर दत्तात्रय केशव, एन.जी.ओ., संत तुकाराम नगर पिंपरी १८ मो.नं. | श्री. पवार विनोद , दै.सामना, मो.नं. ९८२३९६८७८७ |
| 4 | ड | श्री.सिताराम देवचंद बहूरे, ड क्षेत्रीय अधिकारी मो.न. ९९२३९८९७७४ | श्री. विनोद काशिनाथ बेंडाळे सहा.आरोग्य अधिकारी मो. नं. ९९२२५०१८७७ | श्री.गोरक्षनाथ ज्ञानदेव सानप पर्यावरण समिती, पि.चि.परिसर, रक्षक सोसायटी क्रमांक ३, रक्षक चौक, पिंपळेनिलख, मो.नं. ७७४१९९८३९३ | श्री. सिताराम हैबती मोरे, डिलक्स टॉकीजचे मागे, शास्त्रीनगर, पिंपरी पुणे १७. मो.न. ९८५०९११९९६ |
| 5 | ई | श्री.प्रभाकर तावरे, सहा.आरोग्य अधि. ई क्षेत्रीय कार्यालय, मो.न. ९९२२५०१८८५ | श्री.धनंजय गवळी, उप अभियंता, जलनि:सारण, ई क्षेत्रीय कार्यालय मो.नं.९९२२५०१८१० | श्री. शहाजी नाळे निरंकारी सत्संग मंडळ भोसरी पुणे ३९. मो नं. ९८५०९१०१४३ | श्री. विजय जगदाळे, दैनिक पुढारी, पत्ता गंगोत्री पार्क आदिनाथनगर, भोसरी ३९ मो नं ९८२२१७९८८१ |
| 6 | फ | श्री.डि.जे.शिर्के, सहा. आरोग्य अधिकारी, फ क्षेत्रीय कार्यालय, मो.न. ९९२२५०१८७६ | श्री. संजय तुपसाखरे, उप अभियंता पा.पु., फ क्षेत्रीय कार्यालय, मो नं. ९९२२५०१७४७ | श्री.प्रभाकर मेरूकर, यमुनानगर निगडी- ४४ मो.नं. ८३०८८४५८५९ | श्री.अमोल लक्ष्मण काकडे, दै.पुण्यनगरी मो.नं.७७२०९००९५६ |
| 7 | ग | श्री.कुलकर्णी संजय सुधाकर, सहा. आरोग्य अधिकारी, ग क्षेत्रीय कार्यालय मो.नं. ९९२२५०१८७५ | श्री.काळे विजयकुमार चंद्रभान, उप अभियंता, ग क्षेत्रीय कार्यालय मो.नं. ९९२२५०१७३८ | श्री.जगताप संतोष यशवंत, सातारा जिल्हा मित्र मंडळ, काळेवाडी, रहाटणी | श्री.प्रसाद वडघुले, संपादक पौलादी प्रहार |
| 8 | ह | श्री. सासवडकर डी., सहाय्यक आरोग्य अधिकारी, ह क्षेत्रिय कार्यालय, मोबाईल ९९२२५०१८९६ | श्री. एस. डी पोरेड्डी, उपअभियंता, स्थापत्य, ह क्षेत्रिय कार्यालय, मो.नं. ९९२२५०१७४० | श्री. कुमठेकर दत्तात्रय, पर्यावरण, संत तुकाराम नगर, पिंपरी, मो.नं. ८३०८८४५८५९ | श्री. संदीप राना सोनार, लोकमत, तापकीर चौक, काळेवाडी, मो.नं. ९९२३८७८२८८ |

(श्रावण हर्डीकर)

आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -411018